<u>नियमित दिवाणी दावा क्र. १/२००८</u> <u>निशाणी १७७</u>

**वादीतर्फे साक्षीदार क्र.८ यांचा जबाब**
**सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,**

नाव – नितीन ज्ञानदेव पाटील,

वय – ५६ वर्षे व्यवसाय – शिरस्तेदार, उपअधिक्षक, भुमिअभिलेख, मलकापूर, जि. बुलढाणा

पत्ता – रा. विठ्ठल नगर, खामगाव, ता. खामगाव, जि. बुलढाणा

<u>प्रतिवादी व त्यांचे वकील श्री ए. डी. निंबाळकर यांना दुपारी ३.२५ वाजेपर्यंत पुकारा केला असता गैरहजर. साक्षीदार नामे नितीन पाटील सकाळी ११.०० वाजल्यापासून हजर. सबब, प्रतिवादीच्या वकीलांच्या गैरहजेरीत साक्षीदार याचा सरतपास सुरु करण्यात येतो</u>.

**<u>वादीतर्फे विधीज्ञ श्री. एम. एस. सांबारे यांच्यामार्फत सरतपास</u>**

१. मी सन २०१९ मध्ये शिरस्तेदार या पदावर जिल्हा अधिक्षक, भुमिअभिलेख कार्यालय, अकोला येथे कार्यरत होतो. आमच्या कार्यालयामध्ये मौजे गायगाव येथील गट क्र.६३१ ची मोजणी करण्याबाबतचे आदेश मा. दिवाणी न्यायालय, बाळापूर येथून आदेश प्राप्त झाले होते. सदर जमीनीची मोजणी करणेकामी आमच्या वरीष्ठांनी माझी नियुक्ती केली होती. आज मला न्यायालयामध्ये साक्ष देण्याकामी समन्स प्राप्त झाले होते. मी गट क्र.६३१ ची मोजणी केल्याचे मुळ कागदपत्र मी आज सोबत आणलेले आहेत.

२. सदर मोजणी कामी अर्जदार भास्कर शेषराव जगताप यांनी भुमिअभिलेख कार्यालय, अकोला येथे अर्ज दिला. (प्रतिवादी यांचे विधीज्ञ श्री. ए. डी. निंबाळकर सरतपास सुरु असताना दुपारी ३.३५ वा. न्यायालयात हजर) मी सदर मोजणीकामी वादी प्रतिवादी व संबंधित सहधारक ज्ञानेश्वर काशिराम वानखडे, श्रीमती नंदा भास्कर जगताप, श्रीमती शमशाद बेगम मिर्झा उस्मान बेग, श्रीमती नसीम बानो शेख फारुक, मो. इरफान फारुख, मो. इकबाल मो. फारुख, श्री. स्वप्नील भास्करराव जगताप, श्री. प्रल्हाद गेंदुजी बांगर व उपविभागीय अधिकारी, बाळापूर यांना नोटीस काढल्या. गट क्र.६३१ चे पुर्ण क्षेत्रफळ ७ हे. २६ आर इतके आहे. सदर जमीनीची मोजणीची तारीख दि.०९.०९.२०२२ ही निश्चित करण्यात आली.

३. सदर मोजणीकामी माझ्याकडे गट क्र.६३१ च्या हिस्से धारकांचे दि.२२.०९.१९७५ रोजीचे वाटणीपत्र, आमच्या कार्यालयीन पुर्ण अभिलेख, ७/१२ उतारे,

वादी व प्रतिवादी यांच्या खरेदीखतांच्या प्रती इ. दस्त प्राप्त केली होती. दि.०९.०९.२०२२ रोजी मी प्रत्यक्षात मोक्याच्या ठिकाणी गेलो. त्या ठिकाणी वादी, प्रतिवादी यांच्यातर्फे त्यांचा मुलगा सुभाष सुरेश बगेरे, ज्ञानेश्वर काशिराम वानखडे, श्रीमती नंदा भास्करराव जगताप, श्रीमती नसीम बानो शेख फारुख, उपविभागीय जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण उपविभाग, बाळापूर, जलसंधारण अधिकारी, उपविभाग, बाळापूर हे हजर होते. उपविभागीय जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण उपविभाग, बाळापूर, जलसंधारण अधिकारी, उपविभाग, बाळापूर यांना नोटीस पाठविली होती, कारण सदर गट क्र.६३१ मधील जमीनीचे क्षेत्र २ हे. ३ आर इतके तलावाकरीता भुसंपादित झाले आहे.

४. गट क्र.६३१ मध्ये ७/१२ नुसार एकुण ९ पोटहिस्से आहेत. त्यामधील ६३१/१ हा ७/१२ मध्ये हा ८ लोकांचे नाव आहे व ९ वा हिस्सा तलावाच्या भुसंपादनाबाबत आहे. सदरची मोजणी ही ईटीएस मशीनद्वारे मी केली. मी सदर मोजणीकामी ईटीएस मशीनद्वारे गट क्र.६३१ मध्ये असलेल्या वहिवाटदारांचे वहितीनुसार पॉईंट घेतले, सदरचे पॉईंट जोडल्यानंतर त्याची वहिवाट तयार झाली. सदर मोजणीकामी माझ्याकडे जमीनीच्या झालेल्या भुसंपादनाची शिट उपलब्ध होती. सदर मोजणी झाल्यानंतर त्याचा मोजणी नकाशा तयार केला. न्यायालयात दाखल केलेली क प्रत आहे. तसेच नकाशा अ प्रतीचा मुळ अभिलेख मी आज माझ्यासोबत आणलेला आहे. नकाशा क प्रत ही तत्कालीन जिल्हा अधिक्षक श्री. विलास शिरोळकर यांच्या सहीने न्यायालयात पाठविले. आता मला नि.क्र.१६२ कडील अहवाल दाखविण्यात आला त्यावर श्री. विलास शिरोळकर यांची सही आहे, ती मी ओळखतो. आता मला अभिलेखावर वर दाखल असलेली नकाशा क प्रत दाखविण्यात आली, तो नकाशा मी स्वतः तयार केलेला आहे, त्यावर माझी स्वाक्षरी असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१७८** देण्यात येत आहे.

५. सदर नकाशामध्ये W V U T W हा भाग हिस्सा क्र.१ सखाराम तुकाराम जगताप याच्यापैकी पुढे सिंधुबाई जगताप व इतर यांनी प्रतिवादी यांना दि.०५.०४.२००५ रोजी विकलेल्या जमीनीचे क्षेत्र २५ आर हे असून ही जमीन तलावात संपादित झालेली नाही. मोजणी समयी सदर जमीनीवर तलावाची पाणी आढळून आले. सदर नकाशामध्ये संपादित झालेल्या जमीनीचे क्षेत्र (तलावाचा भाग) X, A1, A2, A4, O, R, S, T, U, V, W, X याने दाखविलेला आहे. सदर नकाशामध्ये जांभळ्या रंगाने दर्शविलेला भाग म्हणजे गट क्र.६३१

मधून जाणारे तलावाच्या भिंतीवरील रस्ता आहे. गट क्र.६३१/२ हे क्षेत्र B C Q R B या अक्षरांनी दर्शविलेले वाटणीपत्र हिस्सा क्र.२ चे आहे. ते क्षेत्र राजाराम तुकाराम जगताप यांच्या नावे होते, त्यानंतर त्यांचे वारस जाईबाई जगताप यांनी दि.२२.०१.१९९६ रोजीच्या बक्षीसपत्रानुसार वादी यांना दिले आहे, परंतु सदर हिस्सा मध्ये वादी यांची वहिवाट आढळून आली नाही.

६. गट क्र.६३१/३ हे क्षेत्र वाटणीपत्रानुसार कासाबाई लक्ष्मण यांच्या हिस्साचे आहे. ते क्षेत्र C D P Q C या अक्षरांनी नकाशामध्ये दाखविलेले आहे. गट क्र.६३१/४ हे क्षेत्र D E N P D या आद्यक्षराने नकाशामध्ये दाखविलेले आहे. सदरचे क्षेत्र हे वाटणीपत्रानुसार तानाजी तुकाराम यांच्या हिस्साचे आहे. तसेच गट क्र.६३१/५ ते ६३१/७ हे नकाशामध्ये दाखविलेले आहेत. गट क्र.६३१/१ चे क्षेत्र १ हे. ३ आर व ६३१/२ मधील क्षेत्र १ हे. ३ आर नकाशामध्ये दाखविलेले आहे. गट क्र.६३१/१ मधून तलावाकरीता ४३ आर इतके क्षेत्र संपादित झाले आहे. तसेच गट क्र.६३१/२ मधून ६१ आर इतके क्षेत्र तलावाकरीता संपादित झाल्याचे आढळून आले. सदर नकाशामध्ये जांभळ्या रंगाने दाखविलेला रस्ता दक्षिण–पश्चिम भागामध्ये दाखविलेला आहे. भुसंपादनाचा मुळ नकाशाचा आधार मी सदर मोजणीकामी मी घेतलेला आहे. सदर नकाशामध्ये तलावाचे एकुण भुसंपादित झालेले एकुण क्षेत्र टिप क्र.२५ मध्ये नमुद केलेले आहे. सदर भुसंपादनाची शिट ही सन १९९५ ची आहे.

सरतपास पूर्ण.

**प्रतिवादी यांचे विधीज्ञ श्री. ए. डी. निंबाळकर यांच्या तोंडी विनंतीवरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब करण्यात येत आहे.**

**दिनांकः– ०२.०१.२०२६**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत**

DAYANAND MARUTI WAGHMARE

Digitally signed by DAYANAND MARUTI WAGHMARE
Date: 2026.01.02 17:05:09 +0530

**(डी. एम. वाघमारे)**
**सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,**
**बाळापूर**

<u>प्रमाणपत्र</u>

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णय/आदेश/पुरावा मधील शब्द नि शब्द हे मुळ न्यायनिर्णय/पुरावा/आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :- | **श्री. डी. एम. वाघमारे,**<br>सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर. |
| लघुलेखकाचे नाव | :- | अजय एन. हांडे |
| घोषित दिनांक | :- | ०२/०१/२०२६ |
| न्यायनिर्णय/ आदेश/ पुराव्यावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | :- | ०२/०१/२०२६ |
| अपलोड केल्याचा दिनांक | :- | ०२/०१/२०२६ |